राज्यातील सहकारी साखर कारखान्यांसाठी सहवीज निर्मिती प्रकल्प राबविण्याबाबतचे धोरण

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक ससाका-४४०६ /प्र.क्र. ७३ /३-स
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० फेब्रुवारी, २००८.

वाचा : - १) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक इएसए-१०९३/ प्र.क्र.४११९/उर्जा-५, दि.२०.०६.१९९५

२) शासन निर्णय, उद्योगए उर्जा व कामगार विभाग,क्रमांक पीएसपी-१७९५/ सीआर-२७९९/उर्जा-२, दि.२९.०१.९६

३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्रमांक मेढा-१०९६/ प्र.क्र.९१५९/उर्जा-१, दि.०२.११.९६

४) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग,क्रमांक पीएससी-१०९७/ प्र.क्र.६८/उर्जा-७, दि.१५.१०.९७

५) शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग,क्रमांक ससाका २२९८/ प्र.क्र.३२/३-स दि.१० नोव्हेंबर ९८

६) शासन निर्णय, सहकार व वस्त्रोद्योग विभाग,क्रमांक ससाका ४४००/ प्र.क्र.४०८/३-स, दि. १७ नोव्हेंबर २०००

:

राज्यांतील सहकारी साखर कारखान्यातील ऊसाच्या चिपाडापासून सहवीज निर्मिती ...त्साहन देण्याचे धोरण शासनाने जाहीर केले आहे. परंतु अनेक कारणांमुळे राज्यांत या ...तीत म्हणावी अशी प्रगती झालेचे दिसून येत नाही. कारखान्यांच्या आर्थिक क्षमतेचा विचार ...नाने साखर आयुक्त स्तरावरुन कारखान्यांच्या संमतीने सदरचे प्रकल्प BOT तत्वावर ...पयी प्रोत्साहीत केलेले होते. परंतु BOT वर आधारीत राज्यांत प्रकल्प उभारण्यास ...वेग आला नाही.

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांची सध्याची अवस्था पाहता काही कारखान्याकडे ... निर्मिती प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक ती गंगाजळी नाही. राज्यांतील साखर कारखाने ...ी तत्वावर चालत असल्यामुळे, या प्रकल्पासाठी लागणारे स्वभागभांडवल कारखान्याकडे कमी ...ा उपलब्ध आहे. दुष्काळी परिस्थिती, लोकरी मावा, ऊसाची उपलब्धता व साखरेचे घसरेले भाव ...रा दूरावा निर्माण झाल्यामुळे गेल्या २/३ वर्षात कारखाने आर्थिक संकटात सापडले आहेत.

एकीकडे ऊसाचे विक्रमी उत्पादन तर दूसरीकडे साखरेचे उतरलेले दर यामुळे कारखाने दुहेरी संकटात सापडले आहेत. यावर मात करणेसाठी सहवीज निर्मिती प्रकल्प घेणे आवश्यक झालेले आहे.

राज्यातील साखर कारखान्यांची गाळप क्षमता व सध्या असणारी ऊसाची उपलब्धता लक्षात घेता सहवीज निर्मितीसाठी काही कारखान्यांना आर्थिक मदत मिळाल्यास असे प्रकल्प कार्यान्वित होऊन कारखान्याच्या आर्थिक उत्पन्नात सुध्दा भर पडेल. वीज नियामक मंडळाने दिलेला दर व सवलती पाहता कारखान्याचे वीज हे मुख्य उत्पादन व साखर हे उप-उत्पादन होऊ शकेल व पर्यायाने कारखान्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासही मदत होईल. या सर्व गोष्टींचा विचार करुन तसेच, राज्यांतील विजेची समस्या व कारखान्याच्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी व ग्रामीण भागात रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करण्याच्या व्यापक दृष्टीकोनातून, कारखान्याच्या सहवीज निर्मिती प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण ठरविण्याचा विषय शासनाचे विचाराधीन होता.

वरील सर्व बाबींचा विचार करुन दिनांक २२ जानेवारी, २००८ रोजी मंत्रिमंडळाने यासंदर्भात पुढील प्रमाणे धोरणात्मक निर्णय घेतला आहे :-

**शासन निर्णय -**

(अ) सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून येत्या ३ वर्षात सहवीज निर्मिती प्रकल्पातून १००० मे.वॅट वीज निर्मिती होण्याचे उद्दिष्ठ ठरविण्यात येत आहे.

(ब) यासंदर्भात सहवीज निर्मितीच्या प्रकल्पास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून प्राधान्याने साखर विकास निधी व ग्रीन सेसमधून ३०% भागभांडवल देण्यात यावे.

(क) याबाबत आर्थिक स्त्रोत खालील प्रमाणे ठेवण्यात यावे :-

१) सहकारी साखर कारखान्यांनी स्वत:चे १० टक्के भागभांडवल प्रथम उभा करावे त्यापैकी शासनाकडून जास्तीत जास्त ५ टक्केपर्यंत भागभांडवल महाऊर्जा / राज्य शासन यांनी ग्रीन सेस (Green Cess) मधून उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) त्यानंतर साखर कारखान्यांनी बँका किंवा वित्तिय संस्थांकडून ६० टक्के रक्कम कर्ज स्वरुपात मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात यावे.

३) उर्वरित आवश्यक रक्कम साखर विकास निधीमधून भागभांडवल म्हणून साखर कारखान्यांनी उपलब्ध करुन घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून याचा संगणक क्रमांक २००८०२२०१४२६१५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(डॉ. सुधीर कुमार गोयल)
प्रधान सचिव (सहकार व पणन)
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. मुख्यमंत्री.
सर्व मंत्री
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई
अध्यक्ष, वसंतदादा साखर संशोधन संस्था, पुणे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म. मुंबई
प्रधान महालेखाकार ( लेखापरिक्षा - १ ) महाराष्ट्र राज्य मुंबई.
प्रधान महालेखाकार Vaucher Level Computor Section ( V L C ) महाराष्ट्र राज्य मुंबई.
प्रधान महालेखाकार ( वाणिज्यिक ) महाराष्ट्र राज्य मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
महासंचालक, महाराष्ट्र विकास अभिकरण (मेडा) , पुणे
तांत्रिक संचालक, महाराष्ट्र राज्य वीज मंडळ, मुंबई
कार्यकारी संचालक, वसंतदादा साखर संशोधन संस्था, पुणे
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म., मुंबई
कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई.
कार्यकारी संचालक, मिटकॉन, कुबेरा चेंबर्स, डॉ. राजेंद्र प्रसाद मार्ग, शिवाजीनगर,पुणे ४११ ००५
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
ऊर्जा विभाग - ऊर्जा-१ व ऊर्जा - ७, मंत्रालय , मुंबई- ३२
वित्त विभाग, व्यय-२/हमी शाखा, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वेब- को-ऑर्डिनेटर, कक्ष अधिकारी १६ स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.
कक्ष अधिकारी - १३ स/ २५- स
निवड संग्रह, ३ सी.

\word

प्रत : अवर सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय (२ प्रती)

E:\wordpro

४) साखर विकास निधीतील रक्कम ही ३० टक्केपेक्षा कमी पडल्यास ऊर्जा विभागाच्या ग्रीन सेस फंडामधून अनु. क्र. (क) (१) मध्ये नमूद शासनाचे ५ टक्के भागभांडवलसहीत एकूण कमाल १० टक्केपर्यंत सहभाग उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ग्रीन सेसचा दर ४ पैसे प्रति युनिट ऐवजी ८ पैसे प्रति युनिट करण्याय मान्यता देण्यात आली असून, त्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही स्वतंत्ररित्या ऊर्जा विभागानी करावी.

५) उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे भागभांडवल देण्यासाठी साखर विकास निधीची मान्यता मिळाल्यानंतर व तसेच, वित्तिय संस्था/ बँक यांच्याकडून ६० टक्के प्रस्तावास मंजूरी मिळाल्यानंतर राज्य शासनाकडून तात्पुरत्या स्वरुपात ग्रीन सेसमधील रक्कम उपलब्ध करुन देण्यात येईल.

६) ग्रीन सेस स्त्रोतातून उपलब्ध होणारा निधी कमी पडत असल्यास उर्वरित रक्कम अंदाजपत्रकात तरतूद करुन वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी प्रथमत: रुपये १०० कोटीची तरतूद वर्ष २००८-०९ साठी करण्यात येईल.

सहवीज निर्मितीकरीता कर्ज म्हणून देण्यात येणा-या ६० टक्के रक्कमेस शासकीय थकहमी देण्यात येणार नाही.

प्रकल्प उभारणी आणि समन्वयासाठी साखर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात यावी. हयासाठी आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील. सहकारी साखर कारखान्यांच्या प्रकल्पाचे प्रस्ताव आयएलएफएस (Infrastructure Leasing & Financial Services) किंवा साखर विकास निधीला मान्य असलेल्या संस्थामार्फत तपासून घेण्याची जबाबदारी हया समितीवर राहील.

ज्या कारखान्यांना वरील प्रमाणे प्रकल्प उभा करणे शक्य असेल, अशाच कारखान्यांनी प्रथम प्राधान्यावर सहवीज प्रकल्प घ्यावे व त्यानंतर त्या सक्षम कारखान्यांनी इतर कारखान्यांशी सामंजस्य करार करुन त्यांच्या कारखान्यांसाठी त्याच धर्तीवर प्रकल्प उभारण्यास सक्षम कारखान्यांनी भागभांडवल उपलब्ध करुन दयावे.

१०) सद्य:स्थितीत व भविष्यात सहवीज निर्मितीसाठी केंद्र व राज्य शासनाकडून ज्या आर्थिक व इतर सवलती उपलब्ध होतील, त्या सर्व सवलती हया सहवीज निर्मिती प्रकल्पासाठी देय राहतील.

lpro